# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**वेबसाईट: : http//www.nwcmc.gov.in**   ई-मेल-**info@nwcmc.gov.in**

## डॉ.राम मनोहर लोहिया, ,मुख्य ग्रंथालय व वाचनालय

---

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड शहरात डॉ. राम मनोहर लोहियाच्या नावाने ग्रंथालय व वाचन कक्ष वजिराबाद येथे चालविण्यात येत असुन सदरील ग्रंथालय हे शासन मान्य "अ" दर्जा प्राप्त असुन सदरील ग्रंथालयात मुबलक प्रमाणात मराठी, हिंन्दी, इंग्रजी, व ऊर्दु भाषेचे पुस्तके उपलब्ध आहे. सदरिल ग्रंथालय हे संपुर्ण जिल्हयामध्ये सर्वात मोठे असुन या ग्रंथालया तर्फे आज पर्यंत अनेक सभासदानी, नागरीकांनी विद्यार्थ्यांनी फायदा घेतला असुन विविध विषयावर पि. एच. डी. करणारे प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी आपले संशोधन अंतिम करण्यासाठी संदर्भ विभागातील उपलब्ध संदर्भ ग्रंथांचा आधार घेतला आहे. व या बाबत आपल्या सादरीकरणामध्ये ( प्रेझेंटेशन ) मध्ये ग्रंथालयाचा उल्लेख केलेला आहे.

आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असुन यामुळे आजची पिढी ग्रंथालयाकडे जास्त लक्ष देत नाही ते इंटरनेट, व्हॉटस्अप, फेसबुक, टि. व्ही. विविध चॅनल मध्येच आपला वेळ घालवत आहेत ही युवा पिढी व जेष्ठ नागरिकांना, महिलांना या क्षेत्राकडे वळविण्या करिता म.न.पा. ग्रंथालय विभागामार्फत विविध योजनांची अमलबजाबणी करीत आहे. व कमित कमी वर्गणि आकारुन पुस्तके वाचावयाला देत आहे. आजच्या घडीत ग्रंथालयाची ग्रंथसंपदा ही ७८५४० इतकी असुन दरवर्षी नावाजलेल्या लेखकांची प्रसिध्द मराठी, हिंन्दी, इंग्रजी, उर्दु पुस्तके खरेदी करुन वाचकांना उपलब्ध करुन दिले जातात.

ग्रंथालय प्रवेशाकरीता अनामत रक्कम रुपये ३००/- प्रवेश फी रुपये १०/- व पुस्तकांसाठी महिना ३०/- रुपये वर्गणी आकारली जाते सोबत साप्ताहिक, पाक्षिक, मासिकांचे विभाग स्वतंत्र असुन सभासदांना साप्ताहिक, पाक्षिके, मासिक हवे असल्यास वेगळे ४०/- रुपये वर्गणी महिना दिले तर दोन पुस्तके दोन मासिके घरी वाचण्या करीता देण्यात येतात ३००/- रुपये अनामत असुन जेव्हा सभासद स्वत:चे सभासदत्व बंद करण्याचे अर्ज दिल्यास ते बंद करण्यात येवुन व अनामत रक्कम परत करण्यात येते.

पुस्तकांखेरीज साप्ताहिके, मासिके, व पाक्षिके प्रत्येक जण खरेदी करु शकत नाही. व सर्वांना हे परवडणारे सुध्दा नाही म्हणुन ग्रंथालयाने मासिक विभाग सुरु केले असुन दर महिन्याला फक्त ४०/- रुपये वर्गणी आकारुन दोन मासिके वाचायला देत आहे यामध्ये मराठी, इंग्रजी, व उर्दु भाषेची मासिके उपलब्ध करुन देण्यात येत आहे.मासिक विभाग सुरु करणारी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका ही एकमेव स्थानिक स्वराज्य संस्था आहे.

तसेच दरवर्षी निघणा-या विविध विषयांचे दिवाळी अंक सुध्दा याच वर्गणी मध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याचा अनेक सभासद, नागरिक व वाचक लाभ घेत आहे.

**डॉ. राम मनोहर लोहिया मुख्य ग्रंथालयात खालील प्रमाणे नियतकालिके व वृत्तपत्रे येत आहे**.

| | मराठी | हिंन्दी | इंग्रजी | उर्दु | तेलगु | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| नियतकालिके | २७ | १८ | १८ | ०५ | ---- | ६८ |
| वृत्तपत्रे | ३२ | ०६ | ०८ | ०९ | ०२ | ५७ |

ग्रंथालयाची वेळ पुस्तके देवाण घेवाण करीता सायं ०५ ते रात्री ८.३० पर्यंत असुन रविवार सर्व कार्यालय व व्यापारी हे सुटटीचा आनंद घेत असल्याने त्यांना ग्रंथालयाकडे येण्या करीता व वाचनाकडे त्यांनी आकर्षित होवून आपली वाचनाची भुक भागावी म्हणुन ग्रंथालय दर रविवारी चालु ठेवण्यात येत असुन ग्रंथालयास साप्ताहिक सुटटी दर सोमवारी देण्यात येते.

मुख्य वाचनकक्षा मध्ये उपरोक्त प्रमाणे विविध भाषेचे ५७ वृत्तप्रत्रे येत असुन याची वेळ सकाळ ०८ ते १०.०० सायंकाळी ०५ ते रात्री ९.००. असुन याला साप्ताहिक सुटटी नसतात आठवडयाचे सातही दिवस वाचनकक्ष चालु राहात असुन या मध्ये दररोज १५० ते २०० वाचक फायदा घेत आहे.

सध्या प्रत्येक क्षेत्रामध्ये स्पर्धा वाढली असुन शहराचा विस्तार, लोकसंख्या प्रमाणेच बेरोजगारी सुध्दा त्याच जोमाणे वाढली असुन प्रत्येक विद्यार्थी हे शासकिय नौकरीच्या शोधात आहे व आजच्या घडीला वर्ग १ ते वर्ग ४ चा पदाकरिता महाराष्ट्र शासन व विविध विभागा अंतर्गत होणारी भरती ही लेखी, तोंडी, परिक्षेमार्फत केली जात असल्याने प्रत्येक विद्यार्थी हे स्पर्धाची तयारी करिता दिवस रात्र स्वःताला झोकुन देत आहे. व घरची परिस्थिती व शांत वातावरण, बैठक व्यवस्था, पुस्तके, मासिकाची कमतरता व प्रत्येक विद्यार्थी, प्रत्येक पुस्तक खरेदी करु शकत नाही हे लक्षात घेवुन महानगर पालिकेने आपली जबाबदारी समजुन शहराच्या तिन ठिकाणी स्पर्धा परिक्षा केंद्र सुरु करण्यात आले आहे. सदरील केंद्रामध्ये विविध स्पर्धात्मक परिक्षेचे पुस्तके, नियतकालिके उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच येथील विद्यार्थ्यांना देशात, राज्यात व जिल्हयात होणारी घडामोडी ची माहिती व्हावी. त्यांच्या सामान्य ज्ञानात वाढ व्हावी सोबत विविध कार्यालयातर्फे प्रकाशित होणा-या नौकरी विषयक ची माहिती व्हावी या करिता मराठी, हिंदी, इंग्रजी, वृत्तपत्रे मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात तसेच फक्त नौकरी विषयक जाहिरातीचे प्रसिध्द होणारे मराठी, इंग्रजी वर्तमान पत्र ही मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात या तिन्ही स्पर्धा परिक्षा केंद्राची सविस्तर माहिती दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे.

ग्रंथालय मार्फत चालविण्यात येणा-या तीन स्पर्धा परिक्षा केंद्रापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत (स्टेडियम परिसर) प्रवेशा करीता सामान्य ज्ञान व चालु घडामोडी ई लेखी परिक्षा घेण्यात येवुन सामाजिक आरक्षणानुसार उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे गुणवत्तेप्रमाणे प्रतिक्षा यादी तयार करुन प्रवेश दिला जात आहे सदरील परिक्षा ही दरवर्षी माहे मार्च मध्ये घेण्यात येते

| विभाग | बैठक व्यवस्था | पुस्तकांची संख्या | नियत कालिकांची संख्या | वृत्तपत्रांची संख्या | पिण्याचे पाणी | विद्युत | वेळ | वर्गणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्धा परिक्षा केंद्रवजिराबाद | १२५ | ७३७५ | ३६ | --- | आहे | आहे | स.०८ ते रात्री ९..०० | नाव नोंदणी फी- २५-००/- रुपये<br>प्रवेश फी- २००/- रुपये<br>मासिक फी-१००/- रुपये |
| डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका (स्टेडियम) | १८० | ७७९३ | ३५ | १३ | आहे | आहे | स.०८ ते रात्री ९..०० | प्रवेश फी (खुला प्रवर्ग) - ३००/-<br>मासिक फी (खुला प्रवर्ग)- २००/-<br>प्रवेश फी (मागासवर्गीय) -२००/-<br>मासिक फी (मागासवर्गीय)- १००/- |
| स्पर्धा परिक्षा केंद्र उमर कॉलनी देगलुर नाका | ३५ | ३५१८ | २५ | १२ | आहे | आहे | स.०८ ते रात्री ९..०० | प्रवेश फी - १००/-<br>मासिक फी - ५०/- |

उपरोक्त तिन्ही स्पर्धा परिक्षा केंद्रा मधुन आजपर्यंत हजारोच्या संख्येने विद्यार्थी विविध विभागात आपली सेवा करुन आपली व आपल्या परिवाराची जबाबदारी सांभाळत आहेत.

तसेच सदरील अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करीता आवश्यक सामग्री, नोटस, मासिके, प्रश्नपत्रिका ईत्यादी आपल्या मोबाईलवर पहाणे, डाऊनलोड करण्यासाठी वायफायची सुविधा ही मोफत पुरविली आहे या तिन्ही स्पर्धा परिक्षा केंद्रा मध्ये विद्यार्थ्यांची वाढती मागणी व आसन व्यवस्थाची कमतरता लक्षात घेवुन म.न.पालिकेने शहरात नविन तिन (३) स्पर्धा परिक्षा केंद्र सुरु करण्याची कार्यवाही चालु केली असुन पुढच्या वर्षी या पैकी दोन केंद्र सुरु होण्याची शक्यता आहे.

उपरोक्त सर्व स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी दरवर्षी विद्यार्थ्यांच्या मागणी प्रमाणे पुस्तकांची खरेदी करण्यात येत असुन महानगरपालिका पुस्तकांची किंमत न पाहता विद्यार्थ्यांची गरज व मागणी लक्षात ठेवते.

या खेरिज म.न.पा. शहरात खालील ०७ ठिकाणी वाचन कक्ष चालविण्यात येत असुन त्याचा वेळ सकाळी ८-०० ते १०-०० व सायं ५-०० ते रात्री ९-०० असुन या मध्ये विविध भाषेचे खालील प्रमाणे वृत्तपत्रे व नियतकालिके येत असुन सदरील वाचनकक्ष आठवडयाचे सातही दिवस चालु असतात हे सर्व नागरिकांना मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात. शहरात चालविण्यात येणारे सात शाखेचे नाव व ठिकाण वृत्तपत्रे व नियतकालिकेची माहिती दर्शविणारा तक्ता.

| शाखेचे नाव (प्रभाग) | विविध भाषेच्या वृत्तपत्राची संख्या | | | | | विविध नियतकालिकांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी, | इंग्रजी | ऊर्दू | तेलगू | मराठी | हिंदी, | इंग्रजी | ऊर्दू | तेलगू |
| शाखा अशोकनगर वर्कशॉप | २७ | ०५ | ०५ | १४ | ०१ | १३ | ०१ | ०१ | ०३ | --- |
| शाखा हुतात्मा स्मारक गोकुळनगर | २८ | ०२ | ०२ | १३ | ०१ | १२ | ०१ | ०१ | ०३ | --- |
| शाखा हैदरबाग देगलुर नाका | २० | ०३ | ०२ | १४ | --- | ०८ | ०१ | --- | ०३ | --- |
| शाखा होळी नावघाट | २० | ०४ | ०२ | १४ | ०१ | ११ | ०१ | ०१ | ०२ | --- |
| शाखा सिडि घाट (किल्ला) | १३ | ०२ | ०२ | १४ | --- | ०४ | ०१ | --- | ०२ | --- |
| शाखा साई मंगल कार्यालय हडको | २२ | ०२ | ०२ | --- | --- | ०७ | ०१ | --- | --- | --- |
| शाखा मिल कॉर्नर | १४ | --- | ०२ | १४ | --- | ०२ | ०१ | --- | ०२ | --- |

शहराची वाढती लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता प्रत्येक ठिकाणी वाचन कक्ष सुरु करण्यामध्ये येणारी अडचणे, पण नागरीकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, आपली संस्कृती माहिती व्हावी व चांगले संस्कार निर्माण व्हावेत या करिता म.न.पालिकेने मुंबई, पुणे सारख्या शहराप्रमाणे नांदेड शहरात जनसुराज्य योजने अंतर्गत ५५ ठिकाणी कॉर्नर वाचनालय (वाचन कटटा) सुरु केले असुन सदरिल कॉर्नर वाचनालय मध्ये दररोज १० वृत्तपत्राचा मोफत पुरवठा केला जात असुन याचा त्या त्या परिसरातील ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी फायदा घेत असुन प्रत्येक कॉर्नर वाचनालयात जवळ पास ३० ते ५० नागरिक व विद्यार्थी फायदा घेत आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका विविध मार्गाने फक्त कर वसुल करीत नाही तर शहराच्या नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिलांच्या प्रति आपली जबाबदारी ओळखुन त्या दिशेने सकारात्मक पावले उचलुन त्यांची गरज ही पुर्ण करतात.

***********